**मराठी मजकूराचा इंग्रजी भाषेत अनुवाद करण्यासाठी भाषा संचालनालयात भाषा तज्ज्ञांची नामिका (पॅनल) स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः नामिका:-२०१७/प्र.क्र.८३/भाषा-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २५ जानेवारी, २०१८

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय क्रमांकः एलएनजी-२००७/६८१/प्र.क्र.९/०७/२०-ब, दि. १८ जानेवारी, २००८
२) शासन निर्णय क्रमांकः नामिका-२०१५/ प्र.क्र.१००/भाषा-२, दिनांक १५ फेब्रुवारी,२०१६
३) भाषा संचालनालय, यांचे क्र.मईंम-२०१७ /प्र.क्र.१९० /१९३६/चौदा, दि. ७.१२.२०१७ चे पत्र व क्र.मईंम-२०१८/प्र.क्र.१३/ ९०/चौदा, दि. ११.१.२०१८ चे पत्र

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर राज्याच्या प्रशासनिक वापराकरीता राजभाषा अधिनियम १९६४ अन्वये " मराठी भाषा" ही राज्याची राजभाषा म्हणून स्वीकृत करण्यात आली आहे. त्यानुसार काही वर्जित प्रयोजने वगळता राज्याच्या प्रशासनिक वापरात मराठीचा वापर करणे अनिवार्य आहे. विभागांतर्गत भाषा संचालनालयाच्या अनुवाद शाखेकडून इंग्रजी प्रारुपाचा मराठीत अनुवाद करण्यात येतो. सदर अनुवाद शाखेकडून मुख्यत: शासकीय विधेयके, राज्यपालांचे अभिभाषण, अर्थसंकल्पविषयक प्रकाशने, विधीमंडळ कामकाज, इत्यादी दस्ताऐवज भाषांतराचे काम हाताळण्यात येते. संचालनालयांकडून मराठी प्रारुपाचा इंग्रजी अनुवाद करण्याची कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मराठी प्रारुपाचा इंग्रजी अनुवाद करणाऱ्या खाजगी अनुवादकांची नामिका तयार करण्यात आली होती. तथापि, सदर नामिकेतील काही अनुवादक सध्या कार्यरत नसल्याचे निर्दशनास आले आहे. इंग्रजी अनुवादाच्या नामिकेसाठी इच्छुक असणाऱ्या नवीन उमेदवारांकडून भाषा संचालनालयाकडे अर्ज प्राप्त झाले होते. प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन, तसेच त्यांची लेखी व मौखिक चाचणी घेऊन अनुवादासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची नामिकेवर सदस्य म्हणून नियुक्ती करणे व यापूर्वीच्या नामिकेतील कार्यरत असलेल्या सदस्यांची नावे विचारात घेऊन यापूर्वीच्या संदर्भ क्र.१ व संदर्भ क्रं.२ च्या शासन निर्णयातील आदेश अधिक्रमित करुन सुधारीत नामिका तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

शासनाच्या प्रशासकीय व्यवहारात मराठी मजकुराचा इंग्रजी भाषेत अनुवाद करण्यासाठी संदर्भाधीन क्र. १ व २ येथील शासन निर्णय अधिक्रमित करून यापुढे केंद्र शासन, अन्य राज्य शासन तसेच स्वायत्त संस्था इत्यादीसाठी मराठी मजकुराचा इंग्रजीत अनुवाद करण्यासाठी पुढील तज्ज्ञांची नामिका (पॅनल) स्थापन करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर नामिकेची मुदत तीन वर्षापर्यंत राहील.

| अ.क्र. | अनुवादकाचे नाव | भ्रमणध्वनी / दूरध्वनी क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|
| १ | श्री. द. जि. कनोजिआ<br>५-५०, मुक्तीधाम,<br>न्यू पोलीस कॉलनी,<br>माहिम, मुंबई ४०० ०१६. | ९८६९७३८२०० | dashrahkanojia@gmail.com |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्री. भा. व्य. गिरीधारी,<br>४०१ शुक्रतारा अपार्टमेंट, अे विंग,<br>पी. एल. गार्डन समोर,<br>नवशा मारुती मंदिराजवळ<br>सिंहगड रोड, पुणे-४११ ०३०. | ९८२३०१२३०१,<br>दूरध्वनी :- ०२०-<br>४३०८०८९ | bvgirdhari@gmail.com |
| ३ | श्री. शरद आफळे,<br>ए-४/४, नीतू अपार्टमेंट,<br>राजपार्क को. ऑ.हौ. सो. १<br>जुना मुंबई-पुणे रस्ता,<br>कळवा (पश्चिम)-४२१६०५ | ७७३८५४२३५३ | aphale१९५३@yahoo.com |
| ४ | श्री. रमेश उमाठे,<br>८६, रविंद्रनगर, संचयिनि कॉम्पलेक्स जवळ, (प्रतापनगर) नागपूर, पिन कोड ४४० ०१०. | दू. क्र. ०७१२-२२९०३८८<br>भ्र.क्र. ९८२३०८२३७५. | |
| ५ | श्री. उध्दवराव पांडुरंगजी वानखेडे,<br>५०२, मेघमधुरा अपार्टमेंट, ३८,<br>शिवाजीनगर, सिमेंट रोड, नागपूर.<br>पिन.४४० ०१० | दू.क्र. ०७१२-२२२०३३९.<br>भ्र.क्र. ९४२३०६३३९३. | upwankhede@yahoo.in |
| ६ | श्री. जर्नादन अनंत नाईक-साटम,<br>ऋषिराज को. ऑप. हाऊसिंग सोसायटी, बी-विंग, फ्लॉट नं. ००१, तळमजला, मिरा-भाईंदर रोड, मिरा रोड (ई) ठाणे. | ९८२१४८०६२३. | bssumita@gmail.com |
| ७ | प्रा. डॉ. दिनकर तु खाबडे,<br>प्रबुध्द भारत कॉलनी, सुतार मळा,<br>कोल्हापुर - ४१६०१० | ९९६०३५४९७६ | |
| ८ | प्रा. अनिल श्री. गोरे,<br>अ-११२, बाळाजी प्रसाद दक्षिणमुखी मारुती शेजारी, अप्पा बळवंत चौकाजवळ, थेरले पेशवे पथ,<br>पुणे. ४११ ०३०. | ९४२२००१६७१ | marathikaka@gmail.com |
| ९ | श्री. विवेक जोशी,<br>१०, रामदास सोसायटी, डीसोझा कॉलनी, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ००५ | ९०९६३७५९०६ | drvj.ycmou@gmail.com |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | श्रीमती. सुमिता बोरसे,<br>१०१, विराज अपार्टमेंट, विष्णूपार्क,<br>रावळपाडा, दहिसर (पूर्व) मुंबई- ४०० ००५ | ९९३०२०१७४१ | bssumita@gmail.com |
| ११ | निलेश कृ. बंडाळे,<br>फ्लॅट क्र. ६. पहिला मजला,स्वप्नील अपार्टमेंट, दशमेश नगर, औरंगाबाद - ४३१ ००५ | ९९२३४५२२२३ | transnilesh@gmail.com |
| १२ | श्री. राजन बा. लाखे<br>रो हाऊस नं. एफ-६,<br>गिरीराज विहार बिजली नगर,<br>चिंचवड, पुणे- ४११ ०३३ | ९८९२६५५५२६ | lrajan30@gmail.com |
| १३ | डॉ. एम. एस. दिवाण<br>१४०२/०३ थाईम एवरेस्ट वर्ल्ड<br>कोलशेट रोड,<br>ठाणे (पश्चिम)- ४०० ६०७ | ९९६७०३३२९९ | shreekantdiwan.sd@gmail.com<br>shreekan.tdiwan@ril.com |
| १४ | श्री. यशवंत शंकर थोरावडे<br>चिंतामण प्रसाद सोसायटी फ्लॅट नं.३,<br>तळ मजला, टिळक चौक, कल्याण,<br>ठाणे. | ९९८७०६३४०१ | yashwant2557@gmail.com |

या नामिकेतील नवीन सदस्यांची निवड चाचणीद्वारे नियुक्ती केली असली तरी अनुवाद हे कौशल्याचे काम असल्याने, नामिकेतील सर्वच सदस्यांच्या कामाचा दर्जा देखील वेळोवेळी तपासणे आवश्यक राहील. सुधारित आदेशान्वये निवड केलेल्या नामिकेतील सदस्यांना विविध विभागांकडून कामे प्राप्त होणार असून सदर काम प्रत्यक्ष भाषा संचालनालयाला तपासणे शक्य होणार नाही. सदर नामिकेतील सदस्यांच्या कामाचा दर्जा समाधानकारक आहे किंवा कसे, याबाबतचा अहवाल संबंधित विभागांकडून घेणे आवश्यक राहील. सदस्यांच्या कामाचे मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने संबंधित विभागाकडून नियमित अहवाल मागवून भाषा संचालनालयाकडे याबाबतचे मूल्यमापन करण्याची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. त्यासाठी पुढील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

१) नामिकेतील भाषा तज्ज्ञांनी त्यांच्या कौशल्यानुसार अनुवाद करुन देणे आवश्यक राहील.
२) अनुवादकांनी संबंधित विभागाने दिलेल्या कालमर्यादेत अनुवादाचे काम पूर्ण करावे.
३) सदर नामिकेतील भाषा तज्ज्ञांनी मजकुराचा अनुवाद करतांना भाषा संचालनालयाने विकसित केलेल्या परिभाषा कोशांचा वापर करावा.

४) संबंधित विभागाने नामिकेतील अनुवादकांनी काम पूर्ण केल्यानंतर शासनाच्या विहित दरानुसार अनुवादाचे विहित शुल्क तात्काळ अदा करावे. तसेच टंकलेखनाकरीता प्रचलित दरानुसार स्वतंत्र शुल्क अदा करावे.

५) नामिकेतील अनुवादकांनी त्यांनी केलेल्या कामाचा त्रैमासिक अहवाल भाषा संचालनालय, मुंबई यांच्याकडे सादर करावा.

६) संबंधित शासकिय विभाग / महामंडळे यांनी देखील नामिकेतील सदस्यांनी करुन दिलेल्या अनुवादाबाबतचे आपले अभिप्राय भाषा संचालनालय, मुंबई यांच्याकडे पाठवावे.

७) भाषा संचालनालयाकडून संबंधित विभागांचे अभिप्राय व अनुवादकांचे अहवाल यानुसार नामिकेतील सदस्यांच्या कामाचे वेळोवेळी मूल्यमापन करण्यात येईल.

८) अनुवादाचे काम समाधानकारक नसल्यास सदस्यांची नामिकेवरील नियुक्ती रद्द करण्याचा अधिकार शासनाकडे राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२५१६२३०५६१३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nanda Maruti Raut

Digitally signed by Nanda Maruti Raut
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Marathi Bhasha Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=281d8ee0076aee3a052a490903f93deadef9f7e2a186620ec03666d244838270, serialNumber=baf9d931702558094468 5e047b9c52d64c532684054f19e1f02c374b78e1773f, cn=Nanda Maruti Raut
Date: 2018.02.01 15:04:23 +05'30'

**( नंदा राऊत )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. सचिव, राजभाषा विभाग, विधी आणि न्याय मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली.
४. सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा. विरोधी पक्ष नेते, विधानसभा/ विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
६. सर्व विधानसभा सदस्य /विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई
७. मा. मुख्य सचिव व सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
९. सर्व मंत्रालयीन विभाग, यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावे.
१०. निवासी आयुक्त महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली
११. मा.मंत्री, मराठी भाषा यांचे विशेष कार्य अधिकारी.
१२. सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी.
१३. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई. (पत्राने)
१४. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई. (पत्राने)

१५. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई. (पत्राने)

१६. मा. लोकायुक्त व उप लोकायुक्त, महाराष्ट्र राज्य,मुंबई. (पत्राने)

१७. आयकर आयुक्त, आयकर कार्यालय, मुंबई- ४०० ०२०.

१८. मुख्य वाणिज्यिक व्यवस्थापक, मध्य रेल्वे मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी टर्मिनल्स, मुंबई.

१९. मुख्य वाणिज्यिक व्यवस्थापक, पश्चिम रेल्वे मुख्य कार्यालय, चर्चगेट, मुंबई.

२०. संचालक, भाषा संचालनालय, मुंबई

२१. विभागीय सहाय्यक भाषा संचालक, नवी मुंबई, पुणे, नागपुर, औरंगाबाद.
(भाषा संचालनालयामार्फत)

२२. संबधित मराठी भाषा तज्ञ (भाषा संचालनालयामार्फत)

२३. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२४. महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.

२५. महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.

२६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

२७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

२८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धी देण्यासाठी)

२९. निवडनस्ती. (भाषा-२).